महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक :- ०२/५१२३/२०२०/१५ दिनांक : २७ ऑक्टोबर, २०२१

# -: घोषणा :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत विभिन्न शासकीय पदांसाठी सुयोग्य उमेदवारांच्या शिफारशी संदर्भात राबविण्यात येणा-या निवडप्रक्रियांमध्ये वेळोवेळी करावयाच्या विविध सुधारणात्मक उपाययोजनांपैकी एक म्हणजे स्पर्धा परीक्षांस बसणाऱ्या उमेदवारांचे प्रयत्न / संधीची संख्या मर्यादित करणे, याबाबत आयोगाने घेतलेला निर्णय क्रमांक ०२/५१२३/२०२०/१८, दिनांक ३० डिसेंबर, २०२० रोजी उमेदवारांच्या माहितीकरीता आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

२. दिव्यांग व अनाथ प्रवर्गाकरीताही परीक्षेच्या संधी उपलब्ध करुन देण्याबाबतची बाब आयोगाच्या विचाराधीन होती. स्पर्धा परीक्षेस बसणाऱ्या या प्रवर्गातील उमेदवारांना प्रयत्न/संधीची संख्या मर्यादित करणेबाबत आयोगाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

| **दिव्यांग व अनाथ प्रवर्गातील उमेदवाराची कमाल संधीची संख्या** | **अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती** | **खुला (अराखीव)/आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक/उर्वरित मागास प्रवर्ग** |
|---|---|---|
| | मर्यादा नाही | ९ |

३. स्पर्धा परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांच्या संधीच्या मर्यादेबाबत आयोगामार्फत दिनांक ३० डिसेंबर, २०२० रोजी प्रसिद्ध केलेल्या घोषणेतील अन्य सर्व अटी व तरतूदी जशाच्या तशा लागू राहतील.

४. परीक्षेच्या कमाल संधीबाबतचा आयोगाचा प्रस्तुत निर्णय सन २०२१ मधील जाहिरातीस अनुसरुन आयोजित परीक्षांपासून लागू राहील.

**सचिव**
**ठिकाण : मुंबई** **महाराष्ट्र लोकसेवा आयोग**